स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जळगाव**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मायादेवी मंदिरासमोर, महाबळ रोड, जळगाव**

दुरध्वनी : 0257 2263329 / 2263328 Email :- acswojalgaon@gmail.com

**जा.क्र. सआसक/जळ/भासशि/महाडीबीटी पोर्टल/मार्गदर्शक सुचना/5189/ २०२१-२०२२, जळगाव, दि.०२/१२/२०२१**

प्रति,

प्राचार्य,

.......................................

.......................................

जिल्हा - जळगाव

विषय : महाडीबीटी पोर्टलवर सन 2021-2022 या शैक्षणिक वर्षाकरीता महाविद्यालय व विद्यार्थी यांनी करावयाची कार्यवाही चे अनुषंगाने मार्गदर्शक मुद्दे/सुचना.

उपरोक्त विषयान्वये, सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापासून माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत कार्यान्वीत करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलमार्फत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अनुक्रमे अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी राज्यात करण्यात येते.

नवीन शैक्षणिक वर्ष सन २०२१-२०२२ करिता महाडीबीटी प्रणालीवरील महाविद्यालयाचे प्रोफाईल अद्यावत करणे, जसे प्राचार्य व क्लार्क लॉगीन मधील प्रोफाईलमध्ये अद्यावत मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी, दूरध्वनी क्रमांक, महाविद्यालयाची वेबसाईट व ई-मेल इत्यादी बाबी. तसेच महाविद्यालयातील अभ्यासक्रमाची शुल्क रचना (Fee Structure) अद्यावत करून गत वर्षीप्रमाणे या सर्व बाबींची पडताळणी व खातरजमा करुन संबंधीत शैक्षणिक विभाग (उदा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय व औषध निर्माण विभाग, उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, कृषी संशोधन परिषद, संबंधीत विद्यापीठे, राज्य शिक्षण शुल्क समिती इ.) व तत्सम सक्षम प्राधिकृत यंत्रणेने संबंधीत प्रशासकीय विभाग व सक्षम प्राधिकरण यांच्याकडून महाविद्यालयाद्वारे अद्यावत केलेले शुल्क ऑनलाईन मंजूर करून घेण्याची प्रक्रिया महाडीबीटी प्रणालीवर दि.११ नोव्हेंबर,२०२१ पासून सुरू करण्यात आलेली आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवर सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षामध्ये अर्ज भरण्यासाठी महाविद्यालय व विद्यार्थी यांनी करावयाची कार्यवाहीचे अनुषंगाने मार्गदर्शक आवश्यक मुद्दे/सुचना या पत्रान्वे निर्गमित करण्यात येत आहे. सदरचे मुद्दे/सुचना नुसार महाडीबीटी पोर्टलवर कार्यवाही करण्यात्त यावी. तसेच सदरचे मुद्दे/सुचना संबंधीत यांचे निर्दशनास आणून देण्यात याव्यात.

सोबत : मुद्दे/सुचना

(योगेश पाटील)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, जळगाव

*प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर-*

१) मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
२) मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नाशिक.

(योगेश पाटील)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, जळगाव

Scanned with CamScanner

# कार्यालय : सहायक आयुक्त, समाज कल्याण, जळगाव

## सन 2021-2022 या शैक्षणिक वर्षाकरीता महाडीबीटी अनुषंगाने महाविद्यालय व विद्यार्थ्यांकरिता मुद्दे.

माहिती तंत्रज्ञान विभागाने विकसीत केलेली महाडीबीटी पार्टल हे पूर्णतः आधार प्रणालीशी निगडीत असल्याने पात्र लाभार्थीचा मंजुर झालेला लाभ हा आधार संलग्नीत बँक खात्यावरच जमा होणार हे प्रथमतः लक्षात घ्यावे.

महाडीबीटी प्रणालीवर अर्ज भरतांना अर्जदारांनी स्वतःच अर्ज भरणे अपेक्षीत आहे.

1) महाविद्यालयांनी त्यांच्या प्राचार्य व क्लार्क लॉगीन मधील प्रोफाईलमध्ये अद्यावत मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी, दूरध्वनी क्रमांक, महाविद्यालयाची वेबसाईट व ई-मेल या सर्व बाबींचा समावेश करुन प्रोफाईल भरून माहिती जतन करून घ्यावी.

2) नवीन शैक्षणिक वर्ष सन 2021-22 करिता महाडीबीटी प्रणालीवरील महाविद्यालयाचे प्रोफाईल अद्यावत करणे, महाविद्यालयातील अभ्यासक्रमाची शुल्क रचना (Fee Structure) अद्यावत करून गत वर्षीप्रमाणे या सर्व बाबींची पडताळणी व खातरजमा करुन संबंधीत शैक्षणिक विभाग (उदा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय व औषध निर्माण विभाग, उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, कृषी परिषद, संबंधीत विद्यापीठे, राज्य शिक्षण शुल्क समिती इ.) व तत्सम सक्षम प्राधिकृत यंत्रणेने संबंधीत प्रशासकीय विभाग व सक्षम प्राधिकरण यांच्याकडून महाविद्यालयाद्वारे अद्यावत केलेले शुल्क ऑनलाईन मंजूर करून घेण्याची प्रक्रिया महाडीबीटी प्रणालीवर दि. 11 नोव्हेंबर 2021 पासून सुरू करण्यात आलेली आहे.

3) सर्वप्रथम अर्जदारानी आपले सरकार सेतु सेवा केंद्रावरुन आपले आधार कार्ड सोबत आपला वैयक्तीक मोबाईल क्रमांक अथवा आपल्या पालकाचे मोबाईल क्रमांकाशी लिंक करून घेणे अत्यावश्यक आहे.

4) महाडीबीटी पोर्टलवर नवीन नोंदणी (New Registration) करतांना आधार संलग्नीतच (Aadhar Based New Registration) नोंदणी करण्यात यावी. नवीन नोंदणी करतांना आपणाकडे आधार आहे काय? असे विचारण्यात येते यामध्ये होय पर्याय निवडून 1) ओटीपी व 2)बायोमेट्रीक ह्या दोन प्रकारे नोंदणी करता येते.

5) महाडीबीटी पोर्टलवर एकदा आधार संलग्न नोंदणी झाल्यास पोर्टलवर दुसऱ्यांना आधार संलग्न नोंदणी होणार नाही व नॉन आधार नोंदणी करण्यात येऊ नये,

6) पोर्टलवर एकदा आधार संलग्न नोंदणी केलेला आपला वैयक्तीक युजर आयडी व पासवर्ड जतन करुन ठेवावा. महाडीबीटी पोर्टल करिता यापूढे हाच युजर आयडी व पासवर्ड वापरावा.

7) युजर आयडी अथवा पासवर्ड विसरल्यास मिळविण्याकरिता पोर्टवर सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. *मात्र त्या करिता पोर्टलवर नोंदणी करतांना जो मोबाईल क्रमांक नोंदविला आहे, तोच मोबाईल क्रमांक सोबत असला पाहीजे.*



Scanned with CamScanner

8) जर नोंदणी केलेला मोबाईल क्रमांक अर्जदाराकडे उपलब्ध नसल्यास हरविल्यास सदर मोबाईल क्रमांक रिसेट करण्याची सुविधा इन्स्टीट्युटचे Principal Log-In मध्ये देण्यात आलेली आहे. मोबाईल क्रमांक रिसेट करतांना अर्जदाराचा आधार क्रमांक व सुधारित मोबाईल क्रमांक सोबत ठेवावा इन्स्टट्यूट स्तरावरून मोबाईल क्रमांक रिसेट करावयाचा असल्यास त्या इन्स्टीट्यूटमध्ये अर्जदाराचा परिपूर्ण अर्ज नोंदणी केलेला असावा.

9) ज्या अर्जदारांचे नॉन आधार अर्ज विभागाकाडून मंजुर झालेले आहेत किंवा नॉन आधार नोंदणी केलेली आहे असे अर्ज अर्जदाराचे Log-In मधील प्रोफाईल मधील आधार लिंक टैबचा वापर करून प्रोफाईल आधार संलग्नीत करून घ्यावी.

10) आधार क्रमांक NPCI/PFMS पोर्टलवर लिंक आहे किंवा नाही हे माहिती करून घेण्याकरिता https://resident.uidai.gov.in/bank-mapper या लिंकवर जाऊन यामध्ये आपला 12 अंकी आधार क्रमांक नोंदवावा व सोबत दर्शविलेली विशेष अक्षरे त्याखालील रकान्यामध्ये नोंदऊन Send OTP बटनावर क्लिक केल्यावर सदरहू ओटीपी आपल्या आधार क्रमांकाशी लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावरच पाठविला जाईल अचुक OTP त्यामध्ये नोंदऊन Submit बटनावर क्लिक केल्यास NPCI/PFMS पोर्टलवर बैंक आधार लिंक आहे किंवा नाही याची माहिती मिळेल. असेल तर बँकेचे नांव दर्शविले जाईल सोबत Active/Inactive ही सुद्धा माहिती मिळेल. NPCI/PFMS पोर्टलवर आधार बैंक खाते लिंक करण्याकरिता Aadhaar seeding with NPCI mapping form महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध करून दिलेले आहे. सदर फर्म भरुन आपल्या बँकेमध्ये देण्यांत यावे. आधार-बँक लिंक झाली किंवा नाही याकरिता उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

(11) अर्जदार लॉग-इन अर्जदाराच्या अर्ज स्थितीबाबतची संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्यांत आलेली आहे. यामध्ये प्रथमतः नोटीफीकेशनमध्ये आपले आधार बँक खात्याची लिंक आहे किंवा नाही याची माहिती मिळेल. नसल्यास उपरोक्त अ.क्र.8 नुसार त्वरीत कार्यवाही करणे गरजेचे आहे चालुवर्षांची अर्जस्थिती करिता My Applied Scheme यामधुन माहिती मिळेल. मागील वर्षांची अर्जस्थिती करिता My Applied Scheme History यामधून माहिती मिळेल. सदर दोन्ही टॅब मध्ये पुढील चार टैब दिलेले आहेत. (Under Scrutiny Applications म्हणजे अर्ज पडताळणी मध्ये आहे. यामधील अजंक्रमांकावर क्लिक केल्यास अर्ज कोणत्या स्तरावर आहे याची सद्यस्थितीची माहिती मिळेल) (Approved Applications म्हणजे अर्ज मंजुर झालेला आहे तसेच यामधील Check Redeem Status यावर क्लिक केल्यास मंजुर लाभ दर्शविलेला आहे. यामध्ये अर्जदार व संस्थेच्या पहील्या होता व दुसऱ्या हप्त्याची माहिती दर्शविलेली आहे.) (Rejected Applications म्हणजे अर्ज ना मंजुर करण्यात आलेला आहे) (Fund Disbursed यामध्ये मंजुर लाभ वितरण झाले असल्यास त्याबाबतची माहिती मिळेल व अजंक्रमांकावर क्लिक केल्यास वितरणाची माहिती मिळेल)

12) इन्स्टीट्यूटच्या Principal Log-in मध्ये Institute Disbursement Report तसेच Student Dishursement Report हे सूध्दा उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत यामध्ये विभागाचे नाव योजनेचे नाव/इंस्टॉलमेंट व वित्तीय वर्ष निवडून त्याबाबतची माहिती मिळविता येते. सदर माहिती MS-Excel Format मध्ये Download करुन घेऊ शकता. यामध्ये (1) मंजुर लाभाची रक्कम (2) Reason कॉलममध्ये अर्जाची कारणे देण्यांत आलेली आहेत. 3.Status कॉलममध्ये अर्जाची सद्यस्थिती दर्शविल्या जाते (4) मंजुर लाभाचे वितरण झाले असल्यास Transaction ID / बँकेचे नांव/खाते क्रमांकाचे शेवटची 4 अक्षरे/लाभ जमा झाल्याचा दिनांक)सोबतच इन्स्टीट्युटचे लॉग-इन मध्ये विविध प्रकारचे फॉर्म उपलब्ध करुन दिलेले असून त्यांचासुध्दा वापर करुन घेता येईल.



Scanned with CamScanner

(13) अर्जदाराचा पहील्या हप्त्याची मंजुर रक्कम जमा झाल्यावर दुसऱ्या हप्त्याची कार्यवाही करिता सदर अर्ज संस्थेच्या Clerk Log-In मध्ये उपलब्ध करून दिल्या जातो. असे अर्ज तात्काळ महाविद्यालयाच्या दोन्ही Log-In मधील Scrutiny टॅब मधून मंजूर करून पुढील कार्यवाही करिता पाठविण्यात यावे. वेळोवेळी Scrutiny टॅब मधुन दुसऱ्या हप्त्याची अर्ज प्रलंबित नसल्याची खात्री करून घेण्यात यावी. जेणे करून मंजुर लाभ वेळेत अर्जदार व महाविद्यालयाच्या खात्यात जमा होईल. जो पर्यंत अर्जदाराची मंजुर लाभाची पहील्या हप्त्याची रक्कम आधार संलग्नीत खात्यात जमा होत नाही तो पर्यंत सदरहू अर्ज दुसऱ्या हप्त्याकरिता उपलब्ध होणार नाही.

14) अर्जदाराकडे उपलब्ध असलेली मुळ (Original) प्रमाणपत्रे चांगल्या प्रतीचे PDF मध्ये स्कॅनिंग करून अपलोड करण्यात यावेत, (उदा अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, गुणपत्रीका, खंड प्रमाणपत्र बोनाफाईड प्रमाणपत्र, शिधापत्रीका, डिक्लरेशन प्रमाणपत्र, CAP Letter.) इत्यादी.

15) तसेच जी कागदपत्रे अर्जदाराकडे मुळ स्वरूपात उपलब्ध नाहीत अशी प्रमाणपत्रे साक्षांकीत करुनच अपलोड करावेत (उदा. टी.सी.)

16) महाडीबीटी पोर्टलवर अर्जदाराने अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर सदर अर्ज महाविद्यालयाच्या Clerk Log-In मध्ये पडताळणी करिता उपलब्ध होतो. सदरहू अर्ज प्रथमतः महाविद्यालय स्तरावच पडताळणी होणे अनिवार्य आहे. सदरहू अर्ज आधार संलग्णीत असल्याची खात्री करून घ्यावी (Aadhar Link) जर अर्ज आधार लिंक नसल्यास सदर अर्जामध्ये लाल रंगामध्ये !Non-Aadhar! असे दर्शविलेले असेल, तेव्हा विद्यार्थी लॉग-इन मधून प्रोफाईल मधील !Update Profile As per Aadhar! येथुन आधार लिंक करुन घेण्याच्या सुचना आपल्या स्तरावरून संबंधीत विद्यार्थ्यांस देण्यात यावी. अर्जामधील माहोती पडताळणी करणे, अर्जासोबत जोडण्यात आलेले Documents चे स्कॅनिंग चांगल्या प्रतीची असावी जोडण्यांत आलेले Doc. तेच आहे. किंवा नाही. सदर Documents. वैध आहे किंवा नाही, प्रणालीमध्ये ज्या ठिकाणी जो Document अपलोड करावयाचा आहे तोच Document अपलोड कराण्यास अर्जदारास सूचना देण्यात यावा. बऱ्याच वेळेस TC एवजी इतर Document अपलोड केलेले असतात.

17) Documents स्कॅनिंग शक्यतोवर PDF Format मध्येच स्कॅनिंग करून अपलोड करावेत.

18) राज्य शासनाच्या फ्रीशीप योजनेकरिता नॉन-क्रिमीलेअयर प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरहू प्रमाणपत्र उत्पन्न प्रमाणपत्रासोबत PDF Format मध्ये स्कॅनिंग करून अपलोड करण्यात यावे. त्याशिवाय सदर योजनेचे अर्ज जिल्हा कार्यालयाकडुन मंजूर करण्यात येणार नाही.

(19) जर 2021-22 मध्ये प्रथम वर्षास प्रवेशीत असल्यास व मागील शिक्षणामध्ये खंड असल्यास, सदरहू खंड प्रमाणपत्र T.C. सोबत PDF Format स्कॅनिंग करुन अपलोड करता येईल. तसेच खंड प्रमाणपत्र हे छापील नमुन्यामध्ये न घेता टायपींग करुन घेतल्यास त्यामधील मजकुर चांगल्या प्रकारे लिहीता येईल.

(20) अर्ज पुढे पाठविण्यापूर्वी खंड प्रमाणपत्रावरील माहिती काळजीपूर्वक वाचुन परिपूर्ण असल्याची खात्री करुन घ्यावी.



Scanned with CamScanner

21) शिकत असल्याचे प्रमाणपत्र (बोनाफाईड) प्रमाणपत्रावर माहिती अचुक व खाली दिलेली माहिती भरण्यांत यावी. यामध्ये (1)शैक्षणीक वर्ष (2) महाविद्यालमध्ये अभ्यासक्रमाचे प्रथम प्रवेशीत वर्ष (3) वर्ग ( अभ्यासक्रमासह, तुकडी मान्यतेसह (शासकीय/अनुदानीत/विना अनुदानीत)), (4) दाखल खारीज क्रमांक (5) चालू शैक्षणीक वर्षाचे प्रवेश दिनांक (6) प्रवर्ग, (7) प्राचर्यांची सही व शिक्का सर्व बाबींचा उल्लेख करावा.

22) आवेदनपत्र अर्ज स्कूटीनी करतांना अर्जामधील Scrutiny Remark मध्ये अर्जासंबंधी शेरा नोंदविण्यात यावा जसे खंड प्रमाणपत्र T.C. सोबत अथवा non creamy layer certificate उत्पन्न प्रमाणपत्रा सोबत जोडले असल्यास तसा शेरा Scrutiny Remark मध्ये नोंदविण्यात यावा.

23) महाविद्यालयाकडे Revert करण्यात आलेल्या अर्जाची पूर्तता करूनच अर्ज पूढे पाठविण्यात यावा तसे स्कूटीनी रिमार्कमध्ये सदर बाबत शेरा नोंदविण्यात यावा.

24) Fresh Renewal Applications सन 2020-2021 करिता अर्ज Apply करतांना अर्ज नुतरणीकरणाचा आहे काय? असे विचारले जाते अशा वेळेस अर्जदार कोणत्याही अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षास प्रवेशीत असल्यास Renewal (No) पर्याय निवडण्याचे सुचना अर्जदास देण्यात याव्यात. तसेच अर्जदार द्वितीय, तृतीय इत्यादी अभ्यासक्रमास प्रवेशित असल्यास तेव्हाच Renewal (Yes) पर्याय निवडून 2019-20 वर्षामधील मंजूर झालेल्या अर्जांचे अर्ज क्रमांक नोंदविण्यात यावा. (Application ID).

(योगेश पाटील)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, जळगाव



Scanned with CamScanner